# दत्त जयंती हिमालयामध्ये
# श्रीदत्त जन्मभूमी ऋष्यकुल पर्वतावर साजरी करा...

॥कर्दळीवन॥ सेवा संघ आयोजित

# अनसुया मेळा, तुंगनाथ, चंद्रशिला पिक ट्रेक यात्रा (हिमालय)

## तुंगनाथ, चंद्रशिला पिक, चोपता आणि उखीमठ सह
## देवभूमी हिमालयातील अद्भुत दत्तानुभूती...






- कालावधी : ७ दिवस : दि. २७ डिसें. २० ते २ जाने. २१
- सहभागी शुल्क : हरिद्वार ते हरिद्वार रु. २१,०००/-

✻ फक्त ₹ १०,०००/- भरुन नोंदणी करा.✻

घोडा/पोनी/ जाता येता रु. २०००/- अतिरिक्त

- अत्रि गुंफा : अत्यंत प्राचीन आणि अद्भुतरम्य अत्रि गुंफेचे दर्शन
- अमृतगंगा कुंड आणि झरना : १९५० फूट उंचीचा धबधबा आणि कुंड
- दत्तमेळा : पहाडी जीवनाचे अनोखे दर्शन, मेळा आणि संगीत कार्यक्रम
- पालखी आणि डोली सोहळा : देवलधार, खल्ला, वणद्वार, सगर आणि कठूड वा डोली पालख्या
- दत्तजन्म सोहळा : मनोकामना पूर्ण करणारा अनोखा दत्त जयंती सोहळा

सर्व माहिती व ऑनलाईन नोंदणीसाठी -www.kardaliwan.com/ansuya

**मर्यादित जागा ... त्वरीत नोंदणी करा...**


कर्दळीवन सेवा संघ, पुणे ६२२, जानकी रघुनाथ, पुलाची वाडी, झेड ब्रिज जवळ, डेक्कन जिमखाना, पुणे - ०४

मो: 9657709678 / 9371102439 व्हॉटस्ॲप : 7057617018

फोन: 020-25534601 / 25530371 ईमेल : swami@kardaliwan.com



# अनसुया मेळा, तुंगनाथ, चंद्रशीला पिक ट्रेक यात्रा



देवभूमी उत्तराखंडमध्ये चमोलीजवळ अनसुया हे ठिकाण आहे. श्रीदत्तात्रेयांचा जन्म इथेच झाला अशी श्रद्धा आहे. याठिकाणी अत्यंत प्राचीन अशी अत्रि गुंफा आणि अनसुया मंदिर आहे. अनसुयेचे गर्वहरण करण्यासाठी आपापल्या पत्नींच्या आग्रहावरून ब्रह्मा, विष्णू, महेश इथे आले आणि त्यांनी अनसुयेला निर्वस्त्र होऊन भिक्षा वाढण्याची मागणी केली. अनसुयेच्या पातिव्रत्याच्या प्रभावाने त्या तिघांचेही ६ महिन्याच्या लहान बाळांमध्ये रूपांतर झाले आणि त्यातूनच पुढे चंद्र, दुर्वास आणि श्री दत्तात्रेयांचा जन्म झाला असा कथाभाग आहे. दत्तजयंती निमित्त येथे मोठा मेळा भरतो आणि अनुपम असा पालखी सोहळा होतो. अनसुया यात्रेनंतर पंचकेदार पैकी तुंगनाथ येथे आपण जातो. तेथेच चंद्रमुखी पिक हे ठिकाण आहे. साधारण ४ किमी चा हा ट्रेक आहे. वाटेमध्ये उखीमठ या ठिकाणी जेथे बाणासुराची मुलगी उषा आणि श्रीकृष्णाचा नातू अनिरुद्ध यांचा विवाह झाला त्या ठिकाणी भेट देतो. तेथे ओंकारेश्वर शिवलिंग आणि पंचकेदारांचे दर्शन होते. त्याचवेळी उखीमठ येथे केदारनाथच्या विग्रह मूर्तींचे दर्शन होते. कपाटे बंद झाल्यावर केदारनाथ मंदिरातील मुख्य विग्रह मूर्तींचे उखीमठ याच ठिकाणी वास्तव्य असते.

१) दत्त जन्मस्थान अनसुया यात्रेसाठी **'प्रथम नोंदणी प्रथम प्रवेश'** या तत्त्वावर नाव नोंदणी सुरू आहे. नोंदणी करताना रु. १०,०००/- एवढी रक्कम भरावी लागेल. **बाकी रक्कम १५ दिवस आधी भरावी लागेल. परिक्रमेमध्ये सहभागी होण्यासाठी केलेली नोंदणी कोणत्याही कारणाने रद्द करता येणार नाही. आणि नोंदणी रक्कम परत मिळणार नाही.** यात्रेदरम्यान आधी विहित केलेली एखादी कृती काही अपरिहार्य कारणामुळे रद्द झाल्यास कोणताही परतावा मिळणार नाही. यात्रेसाठी २५ जागा उपलब्ध आहेत. नोंदणी अर्ज, संमती/हमीपत्र आणि शुल्क भरल्यावरच नोंदणी नक्की होईल. सोबत आधारकार्ड + १ फोटो आयडेंटि साईजसह जोडावा आणि कार्यालयात किंवा ईमेलवर पाठवावा.

२) सर्व वयोगटातील स्त्री-पुरुषांना या यात्रेमध्ये मुक्त प्रवेश आहे. यात्रेमध्ये राहण्याची व्यवस्था एका रुममध्ये दोन किंवा तीन व्यक्ती अशी आहे. अनसुया पर्वतावर तंबूमध्ये बेडींग आणि रजईची व्यवस्था केली आहे. तेथे तंबू टॉयलेट व्यवस्था आहे. काही अडचणी आल्यास सहकार्य करावे लागेल. यात्रेदरम्यान सकाळी चहा, नाष्टा, दुपारचे जेवण, संध्याकाळचा चहा, रात्रीचे जेवण अशी व्यवस्था असेल. जेवण साधे, संतुलित आणि पूर्णतः शाकाहारी असेल. दंतमंजन, पाण्याची बाटली, टोपी, टॉर्च, शूज, मोजे, चादर, प्रत्येकाने स्वतः बरोबर घ्यावे. स्वतःचे कपडे एक अंगावर-अधिक २ कपडे जोड, रात्री झोपताना लागणारे कपडे, स्वेटर आणि उबदार कपडे बरोबर घ्यावेत. सामानासाठी पाठीवरची सॅक घ्यावी. एकूण प्रवासासाठी आवश्यक तेवढेच कमीत कमी सामान बरोबर घ्यावे.

३) ही यात्रा हरिद्वार ते हरिद्वार अशी ७ दिवसांची आहे. हरिद्वार ते हरिद्वार हा सर्व प्रवास टेम्पो ट्रॅव्हलर किंवा टाटा सुमो या वाहनाने केला जाईल. या यात्रेमध्ये पायी चालणे जाऊन-येऊन २० कि.मी आहे. आवश्यकतेनुसार अधिक चार्जेस देऊन घोड्याची व्यवस्था उपलब्ध आहे. या परिक्रमेसाठी कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र किंवा चाचण्या जरुरी नाहीत. मात्र शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त आणि सक्षम असणे गरजेचे आहे. थंडीपासून संरक्षणाची व्यवस्था, बेडिंग, रजई पुरविले जाणार आहे.

४) दत्त जन्मस्थान अनसुया यात्रा हा एक उत्कट, चैतन्यदायी आणि दैवी आध्यात्मिक अनुभव असल्याने ज्यांना पुरेसा वेळ काढता येईल, त्यांनीच सहभागी व्हावे, अशी विनम्र विनंती भाविकांना आहे. आम्ही फी म्हणून एवढी रक्कम भरली आहे, आता आम्हाला सर्व सोयी सुविधा वेळल्या वेळी मिळायलाच हव्यात आणि भरलेल्या पैशांची वसुली झालीच पाहिजे, अशा प्रकारचा दृष्टीकोन असणाऱ्या व्यक्तींनी कृपया या यात्रेमध्ये सहभागी होऊ नये, ही विनंती.

५) यात्रेमध्ये कर्दळीवन सेवा संघाने तयार केलेल नियम आणि शिस्त कसोशीने पाळावे लागतील. त्याबाबत नंतर तक्रार चालणार नाही. यात्रेदरम्यान कोणत्याही प्रकारचे व्यसन करण्यास बंदी आहे. ऐनवेळी परिस्थितीनुरूप परिक्रमेच्या कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार कर्दळीवन सेवा संघाने राखून ठेवलेला आहे, याची नोंद घ्यावी.

६) सर्व प्रकारच्या तक्रारी, दावे यासाठी न्यायालयीन प्रक्रियेची सीमा, पुणे शहर न्यायालयीन क्षेत्र हे राहील.

## सहभागी शुल्क :– हरिद्वार ते हरिद्वार रु. २१,०००/–

**शुल्क दोन टप्प्यामध्ये भरता येईल. १. नोंदणी अर्जाबरोबर रु. १०,०००/– २. यात्रा प्रारंभ तारखेपूर्वी १५ दिवस उरलेली रक्कम**

## बँक खात्याची माहिती

**बँकेचे नाव : बँक ऑफ महाराष्ट्र, डेक्कन जिमखाना शाखा, पुणे ४११००४**

**खात्याचे नाव : हिमाद्री टूर्स ॲण्ड ट्रेक्स Himadri Tours and Treks**

**खाते क्रमांक : ६०२४६५९९३९१ IFSC Code : MAHB0000003**

## यात्रा कार्यक्रम - २७ डिसेंबर २०२० ते २ जानेवारी २०२१

- **पहिला दिवस** :– हरिद्वार आगमन व मुक्काम
- **दुसरा दिवस** :– सकाळी ७ वाजता हरिद्वार येथून प्रयाण – मंडल येथे संध्याकाळी पोहोचून मुक्काम
- **तिसरा दिवस** :– सकाळी ७ वाजता चालत किंवा घोड्याने अनसुया – दुपारी १ वाजेपर्यंत पोहोचणे – दत्तजयंती सोहळा + अत्री गुंफा दर्शन – अनसुया येथे तंबूमध्ये मुक्काम
- **चौथा दिवस** :– सकाळी ७ वाजता पायी किंवा घोड्याने मंडल येथे परत – वाहनाने चोपता – मुक्काम
- **पाचवा दिवस** :– तुंगनाथ + चंद्रशीला पिक + ४ कि.मी. चालणे – परत चोपता – वाहनाने रुद्र प्रयाग मुक्काम
- **सहावा दिवस** :– रुद्र प्रयाग ते हरिद्वार – मुक्काम
- **सातवा दिवस** :– सकाळी १० वाजेपर्यंत चेकआऊट

**विशेष सूचना : – यात्रा कार्यक्रम नियोजित आहे. काही अपरिहार्य कारणे, नैसर्गिक समस्या, दरडी कोसळणे, गाडी ब्रेक डाऊन होणे, रस्ता बंद होणे, राजकीय समस्या, आंदोलने इ. आयोजकांच्या मर्यादांपलिकडे काही घटना घडल्यास कार्यक्रमपत्रिकेमध्ये बदल घडू शकतो याची कृपया नोंद घ्यावी. त्यावेळी सर्व प्रकारचे सहकार्य करावे लागेल.**

- **नोंदणी कशी करावी?**

१) नोंदणी अर्ज पूर्ण भरून, सही करून सोबत आधारकार्ड, आणि एक फोटो द्यावा.

२) नोंदणीच्या वेळी रु. १०,०००/– एवढी रक्कम भरावी लागेल. यात्रेच्या तारखेआधी १५ दिवस उरलेली रक्कम भरावी लागेल.

३) **एकदा केलेली नोंदणी कोणत्याही कारणाने रद्द करता येणार नाही. भरलेली रक्कम परत मिळणार नाही. यात्रे आधी २० दिवस आपण बदली व्यक्ती देवू शकता.**

- **यात्रेकरूंना महत्त्वाच्या सूचना**

१) प्रत्येक यात्रेकरूने यात्रेदरम्यान समूहाबरोबरच चालायचे आहे. स्वतंत्रपणे किंवा एकट्याने चालता येणार नाही.

२) हिमालयातील उंचीवरील पर्वतरांगामधील ही यात्रा आहे. प्रत्येक यात्रेकरूला यासाठी तयार केलेले नियम आणि सूचना यांचे पालन करावे लागेल.

३) नोंदणी करताना यात्रेकरूंनी यात्रा करण्यास शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या तंदुरूस्त आहेत याची खात्री करून घ्यावी, ही विनंती.

४) अनसुया यात्रेसारख्या साहसी अध्यात्मिक यात्रांमध्ये काही प्रमाणामध्ये निश्चितच जोखिम असते. प्रत्येक यात्रेकरूने ती नीट समजून घ्यावी आणि आपले जवळचे कुटुंबीय, नातेवाईक यांना त्याची कल्पना द्यावी. प्रत्येक यात्रेकरूने पूर्णतः स्वतःच्या

जबाबदारीवर ही यात्रा करावी. कोणतीही अनपेक्षित घटना घडल्यास कोणत्याही कारणाने आयोजकांना जबाबदार धरता येणार नाही आणि आयोजकांवर कोणतीही कायदेशीर जबाबदारी असणार नाही याची नोंद प्रत्येक यात्रेकरूंनी घ्यावी, ही विनंती.

५) यात्रेदरम्यान फक्त शाकाहारी भोजन आणि थाळी सिस्टीम व्यवस्था केलेली आहे याची नोंद घ्यावी.

६) कोणताही परिक्रमार्थी त्याच्या वर्तनामुळे, शारीरिक परिस्थितीमुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे यात्रा करण्यास अयोग्य ठरला तर त्याला परिक्रमेमधून वगळण्याचा, परत पाठवण्याचा अधिकार यात्रा प्रमुखाकडे असेल याची कृपया नोंद घ्यावी. अशा वगळलेल्या व्यक्तींना कोणताही आर्थिक परतावा मिळणार नाही. यावेळी यात्रा प्रमुखाचा निर्णय सर्वांना बंधनकारक असेल.

७) कृपया नोंदणी करण्यापूर्वी विनासंकोच यात्रेची सर्व माहिती समजावून घ्यावी. शंका समाधान करून घ्यावे. त्यानंतरच नोंदणी करावी.

८) पोनी/घोडा तसेच वैयक्तिक मदतनीस शेर्पा अधिक रक्कम भरून उपलब्ध आहेत. ज्यांना आवश्यकता आहे त्यांनी आधी कल्पना द्यावी.

९) सर्व प्रकारच्या तक्रारी, दावे यासाठी न्यायलयीन प्रक्रियेची सीमा, पुणे शहर न्यायालयीन क्षेत्र हे राहिल.

## अनसुया यात्रा - तयारी आणि कपडे व अन्य आवश्यक सामानासंबधी सूचना

**अ)** यात्रेदरम्यान आपण हिमालयामध्ये १०,००० ते १५,००० फूट उंचीवर चालत जातो. हिमालयातील लहरी हवामान, थंड वारे, अवकाळी पाऊस, बर्फातून प्रवास या गोष्टी नीट समजून घेतल्या पाहिजेत. यात्रेआधीपासून तीन महिने रोज किमान ६ ते ८ किमी चालण्याचा सराव करावा. त्याचबरोबर दीर्घश्वसन आणि प्राणायाम याचा अभ्यास करावा. हिमालयातील परिक्रमा ही फक्त साहसी नसून आपल्या शारिरीक आणि मानसिक क्षमतांची खडतर परीक्षा घेणारी आहे, त्यामुळे आपल्या शरीराची सर्वात जास्त काळजी आपल्यालाच घ्यायची आहे हे प्रत्येक परिक्रमार्थीने लक्षात ठेवावे. आपल्याबरोबर कमीत कमी सामान तसेच थंडी वाऱ्यापासून, पाऊसापासून रक्षण करणारे कपडे आपल्या बरोबर असावेत. प्रत्येक यात्रेकरूने खालील वस्तू आपल्याबरोबर घ्याव्यात अशी सूचना आहे.

१) कानटोपीसह वाऱ्यापासून संरक्षण करणारे जॅकेट - १

२) पूर्ण बाह्याचे स्वेटर - १

३) लोकरीचे हातमोजे १, लोकरीचे पायमोजे - १, सूती पायमोजे-२

४) पँट- टी शर्ट / सलवार कमीज ३ ते ४ सेट

५) ट्रेकींगसाठी मजबूत शूज - १ त्यासोबत शू लेस -२
(नेहमीचे बूट ट्रेकींगसाठी चालणार नाहीत.)

६) पाण्याची बाटली.

७) सन ग्लास गॉगल.

८) छोटी LED बॅटरी सोबत २ सेल एक्स्ट्रा.

९) रेन कोट (मोठा आकार)

१०) सामानासाठी मध्यम आकाराची सॅक - १

११) छोटी पाठीवरची ट्रेकींगसाठी मजबूत सॅक.

१२) सन स्क्रिन लोशन.

१३) रबरी स्लीपर्स इ.

१४) कमरेचा पाऊच - ज्यात कॅमेरा, पैसे, औषधे, कागदपत्रे ठेवता येतील.

**ब)** यात्रेदरम्यान सावध आणि आत्मविश्वासपूर्वक चाल अवश्यक आहे. अवघड वाटांवर चालताना सर्वांच्या बरोबरीने शेर्पा आणि गाईड यांचे सहकार्य घ्यायचे आहे. एकट्याने कुठलेही धाडस करु नये. यात्रा समूहाने करायची आहे. आपली आणि आपल्या समूहाची काळजी आपल्यालाच घ्यायची आहे. आपले लगेज ७ कि.ग्रॅ. एवढ्या मर्यादेमध्ये असावे. जास्त सामानासाठी चार्जेस द्यावे लागतील.

**क)** रात्रीचा मुक्काम हॉटेल/गेस्टहाऊस/तंबू मध्ये आहे. एका रूममध्ये तीन ते चार व्यक्ती असतील. चपाती/ पूरी, डाळ, भाजी, भात, लोणचे, पराठे, सूप ,चहा, कॉफी, आणि स्थानिक भाज्या यांचा आहारात समावेश असेल.